# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज
मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/२०६५/2021-22 दि. १२/१ /2022

<u>अत्यंत महत्वाचे/तातडीचे</u>

**<u>परिपत्रक</u>**

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी/अस्थायी/कंत्राटी कर्मचाऱ्यांनी कोविड-19 लसीकरणाचे दोन डोस घेणे बंधनकारक असल्याबाबत.

महाराष्ट्र राज्यात कोव्हिड-19 तसेच ओमायक्रॉन विषाणूच्या संसर्गामुळे बाधित झालेल्या व्यक्तीची संख्या मोठया प्रमाणात वाढत असल्याने खबरदारी घेण्याच्या दृष्टीकोनातून आवश्यक त्या उपाययोजना करणे अनिवार्य झाले आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेतील अधिकारी/कर्मचारी यांना कोव्हिड-19 तसेच ओमायक्रॉन विषाणूचा संसर्ग होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कार्यरत सर्व स्थायी/अस्थायी/कंत्राटी अधिकारी/कर्मचाऱ्यांनी कोविड-19 लसीकरणाचे दोन डोस घेणे बंधनकारक आहे.

सर्व विभागप्रमुख/खातेप्रमुख यांना सुचित करण्यात येते की, ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी कोविड-19 लसीकरणाचे दोन डोस घेतले आहेत किंवा नाही? याची खातरजमा करुन तसा अहवाल आस्थापना विभागात सादर करावा. तसेच ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांनी कोविड-19 लसीकरणाचे दोन डोस घेतले नसतील अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांना कोविड-19 लसीकरणाचे दोन डोस घेणेबाबत तात्काळ निर्देश द्यावेत. जे अधिकारी/कर्मचारी कोविड-19 लसीकरणाचे दोन डोस घेणार नाहीत अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन अदा केले जाणार नाही, याची स्पष्ट नोंद घेण्यात यावी.

(दिलीप ढोले)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभाग प्रमुख/खाते प्रमुख,
(सदरचे परिपत्रक आपले अधिनस्त कर्मचाऱ्यांचे निदर्शनास आणावे.)

/- ज्या विभागात ठेका स्वरुपात अधिकारी/कर्मचारी कार्यरत आहेत, अशा ठेकेदारांना सदर परिपत्रकाबाबत कार्यवाही करणेकरीता आपल्या स्तरावर कळविण्यात यावे. अन्यथा ठेकेदाराचे देयक अदा केले जाणार नाही.